REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# वित्तीय समावेशन आणि विविध शासकीय योजना:- एक अभ्यास

**प्रा. सौ. रूपाली गोवर्धन दिकोंडा**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थसशास्त्र विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा, ता. माढा, जि. सोलापूर.



**घोषवारा:-**

वित्तीय नियोजन,भविष्याबाबतची सूरक्षितता या गोष्टींचा विचार आपण व आपले कुटुंब यांच्या पर्यंतच करतोपरंतु घरकाम करणारे नोकर, स्वच्छतेचे काम करणारे लोक,झोपडपट्टीत, चाळीत रहाणारे लोक की ज्यांचे उत्पन्न कमी आहे.अशांसाठी केंद्र सरकारने शून्य रक्कम (झीरो बॅलन्स) खात्यात असणारे बँक खाते उघडण्याची 'जन धन योजना' जाहीर करून आमलात आणली.ज्यांना बँक खाते काय आहे? बँकेतील व्यवहार काय असतात अशा अशिक्षीत, अर्धशिक्षीत जनतेपर्यंत बँकिंग सेवा पुरविण्याचा प्रयत्न म्हणजे वित्तीय समावेशन होय.जन धन बँक खातेदाराला रूपे डेबिट कार्ड, केंद्र सरकारने आणलेल्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना,प्रधानमंत्री सूरक्षा बीमा योजना,वृद्धपकाळासाठी तरतूद करून ठेवणारी अटल पेन्शन योजना या खास योजना वित्तीय समावेशनासाठी तयार केलेल्या आहेत. याशिवायगावपातळीवर बँकिंग सुविधांचा वापर कसा करावा याचे प्रशिक्षण लोकांना दिले पाहिजे.तसेच वित्तीय साक्षरते संदर्भातील कार्यक्रम राबविले पाहिजे. परंतु फक्त शासनाने प्रयत्न करून चालणार नाही तर यासाठी व्यक्तिगत पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**प्रस्तावना:-**

वित्तीय नियोजन,भविष्याबाबतची सूरक्षितता या गोष्टींचा विचार आपण व आपले कुटुंब यांच्या पर्यंतच करतो.परंतु घरकाम करणारे नोकर, स्वच्छतेचे काम करणारे लोक,झोपडपट्टीत, चाळीत रहाणारे लोक की ज्यांचे उत्पन्न कमी आहे.अशांसाठी केंद्र सरकारने शून्य रक्कम (झीरो बॅलन्स) खात्यात असणारे बँक खाते उघडण्याची 'जन धन योजना' जाहीर करून आमलात आणली.ज्यांना बँक खाते काय आहे ? बँकेतील व्यवहार काय असतात अशा अशिक्षीत, अर्धशिक्षीत जनतेपर्यंत बँकिंग सेवा पुरविण्याचा प्रयत्न म्हणजे वित्तीय समावेशन होय.जन धन बँक खातेदाराला रूपे डेबिट कार्ड, केंद्र सरकारने आणलेल्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना,प्रधानमंत्री सूरक्षा बीमा योजना,वृद्धपकाळासाठी तरतूद करून ठेवणारी अटल पेन्शन योजना या खास योजना वित्तीय समावेशनासाठी तयार केलेल्या आहेत.प्रस्तुत शोधनिबंधात वित्तीय समावेशना संदर्भातील काही योजनांचा अभ्यास केला आहे.

- **अभ्यासाची उदिष्टे:-**
  १) वित्तीय समावेशनाचा अर्थ समजून घेणे.
  २) वित्तीय समावेशनाच्या विविध योजना समजून घेणे.
  ३) वित्तीय समावेशनाच्या विविध योजनांचा लाभ समजून घेणे

- **अभ्यास पद्धती:-**

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम साधनसामग्री वर आधारीत आहे. हा शोध निबंध सादर करण्यासाठी पुस्तके,वर्तमानपत्रातील कात्रणे ,**Wikipedia, Google Sits.** इत्यादीचां वापर करण्यात आला आहे.

- वित्तीय समावेशनाचा अर्थ:- "वित्तीय समावेशन म्हणजे समाजातील मागास व कमी उपन्न असणार्या लोकांना वित्तीय सेवा प्रदान करणे होय"
- वित्तीय समावेशना संबंधी असणार्या विविध शासकीय योजना पुढीलप्रमाणे:-

- प्रधानमंत्री जन धन योजना:-

ही योजना २८ ऑगस्ट २०१४ ला सुरु झाली.ही भारताची एक आर्थिक क्षेत्रातील वित्तीय समावेशान योजना आहे.ज्याद्वारे,बँक बचत व जमा खाते,प्रदान,जमा करणे,विमा व पेंन्शन या आर्थिक सेवा एकाच परवडणार्या रितीने हाताळता येतात.या योजनेत एकाच आठवडयात भारतीय बंकाद्वरे सुमारे १,८०,९६,१३०इतकी खाती उघडण्यात आली. जून २०१६ पर्यंत हा आकडा २२० लाख इतका पोचला व या द्वारे रु.३८४,११,लाख इतके जमा करण्यात आले.

- जन धन योजना आधारस्तंभ:-

१) पहिला टप्पा:- (१४ ऑगस्ट २०१५ पर्यंत)

या टप्या मध्ये बँकिंग सुविधांचे वैश्वीकीकरण करण्यात आले या टप्या मध्ये ६ महिन्या पर्यंतची आधिकर्ष सवलत देणारे , १ लाख रुपयांच्या अपघाती विम्याची सुविधा असणारे रूपे किसान कार्ड देणारे‘बँक खाते’उघडण्यात आले. तसेच वित्तीय साक्षरता कार्यक्रम राबविण्यात आला.

२) दुसरा टप्पा:- (१५ ऑगस्ट २०१५ ते १५ ऑगस्ट २०१८) या टप्प्या मध्ये

१) ओव्हरड्राफ्ट खात्यामधील बुडालेल्या कर्जा साठी ‘पतहमी निधीची उभारणी करण्यात येणार आहे.

२) सुक्ष्म विमा

३) असंघटित क्षेत्रासाठी स्वावलंबनासारख्या‘पेन्शन योजना राबविण्यात येणार आहेत.

- जनधन योजना लाभ:-

१) या योजनेद्वारे झिरो बॅलन्स खाते उघडतायेते. तसेच सोबत रुपे डेबिट कार्ड मिळते.व १ लाख रुपयांपर्यंतचा विमा उतरविला जातो.

२) खाते उघडल्यानंतर ६ महिन्यांनी खातेदाराला५,०००रु. पर्यंतची अधिकर्ष कर्ज मिळू शकते.

३) या योजनेअंतर्गत खाते उघडण्यासाठी लागणार्या कागद पत्रांच्या अटी रिझर्व्ह बँकेने काहीशा शिथिल केल्या आहेत

- लाभ :-

१) वित्तीय साक्षरता वाढून संघटित वित्त संस्थाकडून होणारा पतपुरवठा वाढणार आहे

२) ग्रामीण भागातील वित्तीय समावेशानाला गती लाभणार आहे.

३) वित्तीय अस्पृश्यता कमी होणार आहे.

४) सुक्ष्म विमा सेवांचा पाया विस्तृत होणार आहे.

५) आगामी काळातील थेटलाभ हस्तांतरण योजनांसाठीचा पाया जलद गतीने उभारला जात आहे

- प्रधानमंत्री वय वंदन योजना:-

ही ६० वर्षे व त्यावरील नागरीकांसाठी पेन्शन योजना आहेया योजनेअंतर्गत जेष्ठ नागरीकांना१० वर्षा पर्यंत ८% परताव्याची हमी मिळेल. या योजनेला गुड्स आणि सेवा कर (जीएसटी) पासून सूट आहे ही योजन सुरु झालेल्या तारखे पासून/घोषित केलेल्या तारखेपासून एक वर्षासाठी उपलब्ध असेल.एलआयसी आतापर्यंत ५८,१५२ पॉलीसी विकल्या आहेत.ही योजना ऑनलाईन तसेच ऑफलाईन खरेदी करता येते.

- प्रधानमंत्री वय वंदन योजनेतील पात्रता अटी

| वय | किमान | कमाल |
|---|---|---|
| | ६० वर्षे पूर्ण | मर्यादा नाही |
| पॉलिसी टर्म | १० वर्षे | |
| निवृत्ती वेतन पद्धत<br>(पेन्शन मोड) | मासिक, तिमाही, सहामाही, किंवा वार्षिक | |
| खरेदी किमंत | रु.१,४४,५७८ मासिक<br>रु.१,४७,६०१ | रु. ७,२२,८९२<br>मासिक |

| | | |
|---|---|---|
| | तिमाहीसाठी<br>रु.१,४९,०६८<br>अर्धवर्षासाठी<br>रु. १,५००००<br>वार्षिक | रु.७,३८००७<br>तिमाहीसाठी<br>रु.<br>७,४५,३४२<br>अर्धवर्षासाठी<br>रु.<br>७,५०,०००<br>वार्षिक |
| निवृत्तीवेतन<br>(पेन्शन) रक्कम | रु. १,०००/-<br>प्रति महिना<br>रु. ३,००/-<br>प्रति तिमाही<br>रु.६,०००/-<br>प्रति<br>सहामाही<br>रु.१२,०००/-<br>प्रति वर्ष | रु. ५,०००/-<br>प्रति महिना<br>रु. १५,०००/-<br>प्रति<br>तिमाहीत<br>रु.३०,०००/-<br>प्रति<br>सहामाही<br>रु.६०,०००/-<br>प्रति वर्ष |

- निवृत्ती वेतन/पेन्शनपेमेंट:-

  १० वर्षाच्या पॉलिसी मुदतीत पॉलीसीधारकाच्या हयातीत,खरेदीच्या वेळी पेन्शनधारकाने निवडलेल्या मासिक/तिमाही/वार्षिक पद्धतीने प्रत्येक कालावधीच्या शेवटी पेन्शनदेय आहे

- मृत्यु लाभ-

  १० वर्षाच्या पॉलिसी मुदती दरम्यान पॉलिसीधारकाच्या मृत्यूनंतऱलाभार्थ्यासाठी खरेदी किंमत परत दिली जाईल.

- मॅच्युरिटी बेनिफिट:-

  पॉलिसी मुदतीच्या १० वर्षाच्या अखेरीपर्यंत पॉलिसीधारक हयात असल्यास,खरेदी किमतीसह अंतिम पेन्शन हफ्ता दिला जाईल.

- सरेंडर मूल्य:- ही योजना पॉलिसी मुदतीच्या दरम्यान अपवादात्मक परिस्थितीत पॉलिसी सोडण्याची मान्यता देतेजसे की,निवृत्ती वेतनधारकास स्वता:च्या किंवा पती/पत्नीच्या कोणत्याही गंभीर/टर्मिनल आजाराच्या उपचारासाठी पैशाची आवश्यकता असू शकते अशा प्रकारामध्ये देय असणारे सरेंडर मूल्य हे खरेदी किमंतीच्या९८% असणे आवश्यक आहे.

- मुद्रा योजना:- प्रधानमंत्री मुद्रा योजनाpradhan Mantri Mudra Yojana (PMMY) देशातील लघु उद्योगांना सहज कर्ज पुरवठा व्हावा या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ एप्रिल २०१५ रोजी २०,००० करोड रुपये भांडवल असलेली ‘मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अॅण्ड रिफायनान्स एजन्सी ‘ म्हणजे मुद्रा बँकेचे उदघाटन केले. या बँकेतून लघु उद्योजकांना१० लाखापर्यंतचं कर्ज सहज उपलब्ध होणार आहे. यासाठी सरकारने एकूण २० हजार कोटीची तरतूद केली आहे. या बॅकेच्या माध्यमातून लघु उद्योगांना कर्ज देण्यासाठी देशातील इतर बॅकानां प्रोत्साहनही देण्यात येईलशिवाय या कर्ज योजनांच्या नियमनाचे काम मुद्रा बॅकेच्या हाती असेल

- मुद्रा- दृष्टी

  समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी जागतिक पातळीवरील सर्वेत्तम पद्धती आणि मानदंडाशी एकात्मिक आर्थिक आणि आधार सेवा प्रदाता बनून एक उत्कृष्टतेचे बेंचमार्क म्हणून काम करणे

- मुद्रा -मिशन:-

आर्थिक सहभाग आणि आर्थिक सुरक्षितता प्राप्त करण्याकरीता आमच्या भागीदार संस्थांच्या सहकार्याने एक समावेशक ,स्थायी आणि मूल्य आधारीत उद्योजकता संस्कृती निर्माण करणे

- मुद्रा-उद्देश:- आमचे मुलभूत उद्देश म्हणजे भागीदार संस्थांचा आधार आणि प्रोत्साहन आणि सुक्ष्म उद्योग क्षेत्रासाठी वाढीचे पस्थित यंत्रणा निर्माण करून समावेशक आणि टिकाऊ पद्धतीने विकास साधणे

- मुद्रा योजनेतील कर्जाचे प्रकार:-

या योजनेत खालील तीन श्रेणीचा समावेश आहे.

१) शिशु:- शिशु श्रेणी अंतर्गत५०,००० रुपयाचे कर्ज मिळू शकते.

२) किशोर:- किशोर श्रेणीत ५०,००० रुपयांपासून ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते

३) तरुण श्रेणी:- तरुण श्रेणीअंतर्गत५ लाख रुपयांपासून १० लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळेल

- मुद्रा योजना वैशिष्ट्ये-

१) देशातील ५.७७ कोटी उद्योजकांना वित्तसहाय्य

२) कोणत्याही प्रकारचा जामीन नाही.

३) वय १८ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

४) अर्जदार कोणत्याही बँकेचा थकबाकीदार नसावा.

## निष्कर्ष:-

केंद्र सरकारने शून्य रक्कम (झीरो बॅलन्स) खात्यात असणारे बँक खाते उघडण्याची ‘जन धन योजना’ जाहीर करून आमलात आणली.ज्यांना बँक खाते काय आहे? बँकेतील व्यवहार काय असतात अशा अशिक्षीत, अर्धशिक्षीत जनतेपर्यंत बँकिंग सेवा पुरविण्याचा प्रयत्न म्हणजे वित्तीय समावेशन होय.जन धन बँक खातेदाराला रूपे डेबिट कार्ड, केंद्र सरकारने आणलेल्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना,प्रधानमंत्री सूरक्षा बीमा योजना,वृद्धपकाळासाठी तरतूद करून ठेवणारी अटल पेन्शन योजना या खास योजना वित्तीय समावेशनासाठी तयार केलेल्या आहेत.परंतु फक्त शासनाने प्रयत्न करून चालणार नाही तर यासाठी व्यक्तिगत पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे

## संदर्भ:-


1. महाराष्ट्र टाइम्स “ आर्थिक समावेशनाची सुरुवात आपल्या घरापासून’ २० मे २०१५
2. Chakrabarty K.C. (2013) “Financial Inclusion in India –A journey so far and way forward”, Address delivered at Financial Inclusion Conclave, CNBC TV 18, and September 6, 2013
3. Mukherjee Pranab (2010)http://articles.economictimes.indiatimes.com/2010-02-07/news/ 27604883_1_financial-inclusionunbanked-population-financial-services,Retrievedon23rd November 2014.
4. Rangrajan .C. (1996), Rangrajan Committee Report, International Journal of Management and Applied Science, ISSN: 2394-7926 Volume-4, Issue-2, Feb.-2018 http://iraj.in
5. Rangarajan, C. (2007), “Financial Inclusion – Some Key Issues”, Lecture delivered at Mangalore University, Mangalore, August 10, 2007.
6. 16.Thorat, Usha (2007), “Taking Banking Services to the Common Man – Financial Inclusion”, Deputy Governor, RBI, at the HMT-DFID Financial Inclusion Conference, Whitehall Place, London, UK, June 19, 2007, Speech.
7. www.rbi.org.in
8. www.ssrn.com.